


REFBK-0011961

REFBK-0011961

# श्रीदत्त-गीतें

सुधांशु

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १५२९

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक 30625 वि: 91/04
9429 नों: दि: 20/5/64

श्रीदत्त-प्रसाद : पुष्प २ रें

# श्रीदत्त-गीतें

सुधांशु

REFBK-0011961
REFBK-0011961

99.९९७

ज्योत्स्ना प्रकाशन

मूल्य ५० नये पैसे

• सर्व हक्क लेखकाधीन

• प्रथमावृत्ति
१७ मार्च १९६१

• मुद्रक :
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

• प्रकाशक–
ल. गो. परांजपे
५५/१४ मुगभाट
मुंबई ४

# हीं प्रसाद-पुष्पें !

मी औदुंबरवासी ! अर्थात् दत्तभक्त. गायनसेवा दत्तगुरूंना आवडते. मी केव्हां केव्हां वेडेवाकुडें गातों. पण शक्यतों पदें नवीन करून. त्यांतील कांहींची श्री. ल. गो. परांजपे आज माला गुंफीत आहेत. मी सर्वच जपून ठेवलीं नाहींत. कांहीं हरवलीं – कांहीं विसरलीं – कांहीं भारतीय नभोवाणीनें झेललीं. जगाला वाटलीं. कांहीं ग्रामोफोन कंपनीनें उचललीं. रसिकांपुढें ठेवलीं. त्यांचें हें सत्कृत्यही श्रीदत्तचरणीं रुजूं आहे. मी काय गौरव करणार ?

आज श्री. परांजपे यांच्या ओंजळींत कांहीं प्रसाद-पुष्पें टाकीत आहें. ते भाग्यवान्, त्यांनीं ही संधि मिळविली.

एकदां वाहिलेलीं म्हणजे प्रसाद-पुष्पेंच तीं ! दत्तभक्तांना तो अनुग्रहच !

औदुंबर
गुरुप्रतिपदा
१ – २ – ६१

सुधांशु


## सुधांशु–साहित्य

१ कौमुदी [ काव्य ]
२ विजयिनी [ काव्य ]
३ जलवंती [ काव्य ]
४ उगवते तारे [ प्रा० काव्य ]
५ गीतसुगंध [ भावगीत ]
६ गीतसुवर्ण [ भावगीत ]
७ श्रीदत्तजन्म [ संगीतिका ]
८ प्रसाद–पुष्पें [ श्रीदत्त-गीतें ]
९ खडकांतील झरें [ लघुकथा ]
१० चतुरादेवी [ बालकथा ]
११ सुभाषकथा [ बालकथा ]
१२ नेता० स्वातंत्र्य–संग्राम [ पोवाडा ]

ह. न. जोशी ' सुधांशु, '

सुधांशु–सदन,
मु. पो. औदुंबर
जि. सांगली.


हीं गीतपुष्पें
श्रीगुरुदत्तचरणीं
भक्तिभावपूर्वक समर्पण



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: वि: ........

श्रीदत्तगुरूंच्या
विमल पादुका

क्षेत्र औदुंबरचें
दत्तमंदीर





महाराष्ट्राचे लाडके भक्तिभावगीतलेखक श्री. ह. न. जोशी ऊर्फ कवि सुधांशु हे औदुंबर या दत्तक्षेत्रींचे रहिवासी. श्रीदत्तदेवस्थानचे पुजारीवर्गांपैकींच. काव्य, कथा, गीत, संगीतिका, बालकथा, पोवाडे असे अनेक साहित्यप्रकार यांनीं लिहिलें. नभोवाणीवरून यांचीं भक्तिभावगीतें लोकप्रिय झालीं आहेत. 'दत्तदिगंबर दैवत माझें" हें सुधांशूंचें, भक्तिगीत तर महाराष्ट्राचें उपासनागीत झालें आहे.

उठा उठा हो दत्तात्रया
जगदुद्धारा करुणालया
अरुण येऊं पाहे उदया
      पवन वाहे शीतल          १

आले दर्शनासी मुनिवर
तिष्ठती कधिंचे द्वारीं सुर
आस पुरवा योगीश्वर
      नम्रभावें विनविती          २

तपस्वी सहस्रार्जुन भक्त
आले भक्त दासोपंत
जनार्दनस्वामी एकनाथ
      कृपावंत व्हा त्यांना          ३

सद्गुरु वाट पाहे सृष्टी
एकदां पहा करुणादृष्टी
करा कृपेची अमृतवृष्टी
      विश्वकमल हासवा          ४

११९६७

जय योगीश्वर दत्तदिगंबर
जय त्रैमूर्ती करुणासागर !

सतिचें सत्त्व पहाया आले
विधि हरि शंकर बालक झाले
श्रीदत्तात्रय नाम पावलें
जनकार्या संचरती भूवर १

भस्म चर्चिलें सर्वांगाला
रुद्राक्षांच्या कंठीं माला
पायिं खडावा कटीं मेखला
जटाभार शोभतो शिरावर २

अनन्यभावें जे गुरु भजती
चौऱ्यांशीचे फेरे चुकती
नामामृत मधु मधुर सेविती
त्यांवरि गुरूची मायापांखर ३

जय जय दत्तात्रय मूर्ती
गुरूची अघटित गुणकीर्ती !

निरंतर गंगेचें स्नान
भोजना कोल्हापुर स्थान
माहुरी हो निद्रामग्न
त्रिभुवनीं सदैव संचरती १

गुरूचा अभिनव अवतार
करंजे नगरीं साचार
जन्मतां ॐ कारोच्चार
वेद ते उपनयनीं वदती २

उठविती मृत अभिनवकरणी
वदविती वेद अंत्यज–वदनीं
शुष्कतरु फुलविति नवपर्णी
कृपाळू निजदासावरती ३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम.................. दि: ..................
क्रमांक .................. नों. दि ..................

दत्तदिगंबर दैवत माझें
हृदयीं माझ्या नित्य विराजे !

अनसूयेचें सत्त्व आगळें
तिन्ही देवही झालीं बाळें
त्रैमूर्ती अवतार मनोहर, दीनोद्धारक त्रिभुवनीं गाजे १

तीन शिरे कर सहा शोभती
हास्य मधुर शुभ वदनावरती
जटाजूट शिरीं, पायिं खडावा, भस्मविलेपित कांती साजे २

पाहुनि प्रेमळ सुंदर मूर्ती
आनंदाचे आंसू झरती
सारे सात्त्विक भाव उमलती, हळु हळु सरतें मीपण माझें ३

गुरुदत्त पाहिले कृष्णातिरीं
शतदीप उजळले माझ्या उरीं !

चरण क्षाळिते कृष्णामाई
छत्र, तरूंची शीतल राई
गोड आरती खगगण गाती, भुलली स्वर्गपुरी १

यतिवेषें गुरुमूर्ति शोभली
अपार करुणा हृदयीं भरली
सूर्यचंद्रमा नयनीं, वदनीं शांतिसुमें साजिरी २

प्रभुरायाचीं शुभद पाउलें
सेवाया सुर भूवर आले
माझ्या नयनामधुनी झरती प्रेमाश्रूंच्या सरी ३

दत्तगुरु सुखधाम
माझा — दत्तगुरु सुखधाम !

मेघ दयेचा अत्रीनंदन
तृषित चातक येतां धावुन
फुलविल त्याचें विकलित जीवन
पतिता जो आराम १

विनम्र भावें जे जन भजती
सिंधु सुखाचा त्या गुरुमूर्ती
त्रिविधताप अविलंबें हरती
घेतां मंगल नाम २

गाउंया दत्त दत्त वदनीं
गाउंया दत्त दत्त भजनीं
तयावांचुनी कोण विसांवा, मनुजाला त्रिभुवनीं

त्रैमूर्ती हा दत्त दिगंबर
भस्मांकित तनु सतेज सुंदर
ऋषिमुनि ध्याती जया निरंतर, स्तविती सुर निशिदिनीं १

कळिकाळासी धाक जयाचा
मायबाप हा निजदासांचा
शेष भागला वेदपुराणें थकलीं गुणगायनीं २

दत्त दिगंबर मधुर चंद्रमा
चकोर बनुनी सेवूं सुषमा
वारकरी अम्हि अमरपुरीचे, नाचूंया रंगणीं ३

दत्तगुरु जय दत्तगुरु
भक्तजनांचा कल्पतरू !

अनसूयेचा होउनि नंदन
त्रैलोक्याचें फुलवी नंदन
तापदग्ध या मरूभूमीवर लागे अमृतमेघ झरू १

हा योग्यांचा योगी गुरुवर
दासावरि करी मायापाखर
भवसागर हा दारुण त्यांतुन पार कराया हो तारू २

दत्तगुरुपदीं जे जन रतले
जन्ममृत्युभय त्यांचें सरलें
पाप ताप अन् दैन्य हराया दत्तगुरूचें चरण धरूं ३

पाहुंया दत्तात्रय मूर्ती
मुखानें गाऊं गुणकीर्ती

गुरूची भस्मांकित काया
जटेचा शोभे भार जया
तपाची तेजस्वी कांती १

गुरुवर योग्यांचा योगी
विरागी आत्मसुखा भोगी
अंतरीं सुरही आळविती २

गुरु हा करुणेचा सिंधू
गुरु हा दीनांचा बंधू
गुरुपदीं सर्व सुखें वसतीं ३

गुरूला भावफुलें वाहूं
कृपेच्या अमृतांत न्हाऊं
निरंतर पावूं सुखशांती ४

घडि घडी स्मरतें मी अंतरीं
गुरूची प्रतिमा ती साजिरी !

वदनीं शांती, कांती सुंदर
तेज पाहुनी लाजे भास्कर
करुणादृष्टी बघे चराचर, अथांगमाया उरीं १

ध्यान शुभंकर त्रैमूर्तीचें
भान हरपवी तनूमनाचें
ऋषीमुनीही नित्य पूजिती हृदयाच्या मंदिरीं २

दत्तगुरु मी सतत चिंतितें
गुरुनामीं मी रंगुनि जातें
मंगलचरणीं हळूं अर्पितें भावगीत मंजिरी ३

सखे मी औदुंबर पाहिलें
गुरूचे दिव्यचरण वंदिले !

कृष्णा वाहे शांत मनोहर
निसर्ग नटला अनुपम सुंदर
वृक्षवरांच्या कुशींत हरिचें वैकुंठच शोभलें १

विमल पादुका तीरावरती
हृदयिं निरंतर सुरगण ध्याती
ध्यानीं मी रंगतां अनावर देहभाव लोपले २

क्षणांत विरुनी सारी खळबळ
झालें अंतर प्रशांत निर्मळ
त्या शांतीच्या सुखांत अजुनी मन माझें रंगलें ३

श्रीसद्गुरु जय सद्गुरु
गुरु उद्धरा हें लेकरूं !

मतिहीन मी अज्ञान मी
चुकतों दयाळा नेहमीं
हंसवा खुळें हे वासरूं १

कधिं सान थोर न जाणिलें
साधूजनाना नाडिलें
भ्रमलें प्रभू हें पांखरूं २

नच सेविलें तुमच्या पदा
नच नामही वदनीं कदा
मी पातकी, मी पामरू ३

करुणाघना करुणा करा
अपुलें म्हणा या लेकरा
चरणा कुणाच्या मी धरूं ४

मी लेकरूं तुम्हि माउली
मी वासरूं तुम्हि गाउली
देऊं नका हो अंतरू ५

सखींनो जाऊंया सख्यांनो जाऊंया
नयनीं पाहूंया औदुंबर !

औदुंबरतळीं दत्तगुरुमूर्ती
तिष्ठते त्रैमूर्ती भक्तकाजा १

विमल पादुका दिव्य, मनोहर
देखूनी अंतर सुखावते २

वाहाते चरणीं रम्य कृष्णामाई
भुवनेश्वरी आई पैलतीरीं ३

त्रिकाळ चालते मंगल आरती
कौतुक पहाती सुरवर ४

मंत्रनाम घोष भक्तीचा सोहळा
दाटतो उमाळा हृदयांत ५

चला हो गुरूच्या करुणेंत न्हाऊं
समाधान पावूं निरंतर ६

स्मरा स्मरा हो दत्तगुरु
दत्तगुरु भवताप हरू !

दत्तगुरूचें नाम मधुर हो
दत्तगुरुपद स्मरा चतुर हो
दत्तकृपें भवसिंधु तरूं १

भस्मांकित तनु, कटीं पितांबर
जटामुगुट शिरीं, त्रिशुळ, डमरूधर
ध्यान गुरूचें शुभंकरू २

दत्तगुरु स्मरतांच धावतो
दत्तगुरु भक्तास पावतो
दत्तगुरूचे चरण धरूं ३

चला भाविकांनो औदुंबरीं जाऊं
भक्तांचा कैवारी नरहरी पाहूं !

पाहुनी निवांत रम्य कृष्णाकांठ
राहिले त्रैमूर्ती थाटलें वैकुंठ
सदा सर्वकाळ गुरुनाम गाऊं १

चर्चियलें भस्म गुरूंनीं सर्वांगीं
दिव्य दंडधारी विरक्त, विरागी
शांत तपोमूर्ती अंतरांत ध्याऊं २

सदा कृपावंत माउली जगाची
बघे कृपादृष्टी वृष्टि अमृताची
होउनी बालक चरणीं विसावूं ३

ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३०८६ दि. ९०/८/९७
१५२१
११९६७

दत्तगुरु आधार
जगाला दत्तगुरु आधार !

दर्शनमात्रें हरती पापें
करितो भक्तोद्धार १

प्रसन्न ज्याते सद्‌गुरुमाई
होई भवनदिपार २

करुणादृष्टी पाहे सृष्टी
हृदयीं शांति अपार ३

नमन करूंया चरण धरूंया
वरूंया जीवनसार ४

अत्रिसुता यतिराया
वंदन तव शुभपाया !

करि धरिसी चक्रगदा
सुरवरही लीन पदा
भस्मांकित तव काया १

महाबिकट काळ उरीं
श्रीगुरु तव धाक धरी
दासावरि तव माया २

जगचालक, जगपालक
प्रभु तूं जगदुद्धारक
मति दे तव गुण गाया ३

औदुंबर क्षेत्र थोर
कृष्णातिरिं अति पवित्र
　　उद्धारा दासांच्या
　　सज्ज सदा अत्रिकुमर !

ऋषिमुनि तप आचरती
सुरवरही आळविती
वैकुंठच भूवरतीं
　　वसत इथें विश्वंभर　　१

आनंदाचे दीप आज उजळले
साफल्याचे बाग आज बहरले !

आज पाहिलें श्रीऔदुंबर
कृष्णाकाठीं वसलें सुंदर
निसर्ग नटला नव चेतोहर
सुरम्य ऐशा मनोरमस्थळीं मन माझें रंगलें १

आज गुरूचें दर्शन झालें
शत जन्मांचें वांछित फळलें
युगायुगांचें पातक जळलें
सार्थक झालें नरजन्माचें भाग्यपुष्प उमललें

मी भजतों गुरुमाउली
भवतापा जी साउली !

संसारीं मी जेव्हां चुकतों
अखिल जगा अवमानुनि हसतों
फसतो—पश्चात्तापें जळतों
शांतवितें मम विकलचित्त जी फिरवुनिया अंगुली १

मर्त्य जिवांना सुधाधार ही
पापात्म्यांची गंगामाई
युगायुगांची ही पुण्याई
सुरासुरांची आई मी नित शरण हिच्या पाउलीं २

ती आठवते मज दिव्य पहाट
प्रभुरूप पाहिलें मी स्वप्नांत !

मंगलमय यतिरूप मनोहर
भस्म रेखिलें त्रिपुंड्र सुंदर
रुद्राक्षांच्या शोभति माला श्रीगुरुच्या कंठांत १

दंडकमंडलु शोभे हातीं
पायिं खडावा दिव्य गर्जती
तेजोमय ती शरीरकांती दाटे हर्ष मनांत २

नमन करावे चरण धरावे
कुणास ठावे ? मज न आठवे
तेज लोपलें आणि पाउलें मी शोधीत तमांत ३

अतां चरण ते कुठुनी दिसतिल ?
हृदयपाकळ्या केव्हां फुलतिल ?
स्मरुनि अतां तो क्षण मी रमतों आपुल्याच नादांत ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3.८६८ विः ........
क्रमांक ७५२७ नों: दि: ........

बाळा जो जो रे, कुलभुषणा
अनसूयानंदना
बाळा जो जो रे!

विधिहरिहर आले, मिळुनीया
सतिचें सत्त्व पहाया
पुण्यवती थोर मुनिजाया
भ्रम देवांचा वाया
बाळा जो जो रे! १

झाले पुत्र तिचे सुकुमार
नवल वर्तलें फार
जमले देव नभीं सत्वर
करिती जयजयकार
बाळा जो जो रे २

बालक हालविते अनसूया
अत्रिऋषींची जाया
सद्गुरु अवतार जगतीं या
झाला जन ताराया
बाळा जो जो रे ३

अनसूयेच्या धामीं
आले त्रैलोक्याचे स्वामी !

गुलाल उधळा, उधळा सुमनें
जयजयकारें घुमवा भुवनें
पूर्णब्रह्म हें आलें भूवर धर्मरक्षणाकामीं 1

होइल गुरु हा त्रैलोक्याचा
उद्धारक हा चराचरांचा
हा योग्यांचा योगी होइल प्रभु हा त्रिभुवनगामी 2

होतां याचें मंगलदर्शन
आनंदानें नटेल जीवन
नंदनवन हा सुरासुरांच्या हंसविल अंतर्यामीं 3

श्रीगुरु निद्रा घ्या आतां
सद्गुरु निद्रा घ्या आतां
कष्टला भक्तजनाकरितां !

भक्तीची मधुपर्णें जमवुनि
विडा बनविला चतुर्दशगुणी
दिधला प्रेमें घ्या हो मानुनी
सुखवा निजचित्ता १

हृदयाचें हें निर्मळ मंदिर
सद्बुद्धीचा मंचक सुंदर
भावफुलांची शेज मृदुलतर
रचिली गुरुनाथा २

विनविति जोडुनि हात भक्तजन
श्रमला बहुपरि अत्रीनंदन
सुखें निरंजनीं पहुडा आपण
दत्ता अवधूता ३

दत्ता दयाघना
बहुत कष्टलों–बहुत भागलों–
आलों तव चरणा !

तूंच माउली, तूंच साउली
सुखें सकलही तुझ्या पाउलीं
कां वणवण फिरविसी बालका, येऊं द्या करुणा १

अपराधी मी दीन लेकरूं
आस कुणाची तुझ्याविण धरूं ?
माता रागेजतां श्रीगुरु– जावें शरण कुणा ? २

चुकतां कोठें तूंच सावरी
भवसिंधूंतुन ने पैलतिरीं
कोण तुझ्याविण सांग श्रीहरी सुखविल भक्तजना ३

REFBK-0011961
REFBK-0011961
30८६५ ९५२१ १०।५।६७
११००६९

## श्रीक्षेत्र औदुंबर भक्तमंडळ

१९५५ सालीं हें औदुंबर भक्तमंडळ स्थापन झालें असून त्यातर्फे येथें दत्तमंदिरापुढें बारा हजार रुपये खर्चून सभामंडप बांधला आहे. शिवाय येथें येणाऱ्या यात्रेकरूंसाठीं सर्वसोयींनीं युक्त अशी धर्मशाळा व इतर अनेक सुधारणा करण्याचा मंडळाचा मानस आहे. लोकाश्रयावांचून हें कसें होणार? औदुंबरीं आलेवर मंडळाच्या कार्याची कृपेनें नोंद घ्यावी. किंवा श्री. प्र. य. रानडे, सेक्रे० औदुंबर भक्तमंडळ, शहा बिल्डिंग नं. ३, रिवोली सिनेमाजवळ, माहीम, मुंबई १६ यांचेकडे चौकशी करावी.

आपण औदुंबरीं येणार ना?

मग —

◎ राहण्यासाठीं स्वतंत्र जागा.

◎ धार्मिक कार्यें करण्याची विश्वासू सोय.

◎ योग्य मार्गदर्शन. हें हवेंच !

त्यासाठीं खालील ठिकाणीं अवश्य भेट द्या —

हणमंत नरहर जोशी (सुधांशु)
मु. पो. औदुंबर जि. सांगली

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
दि. ..........